E:\vasant\shaheb\circular

University of Mumbai

मुंबई विद्यापीठ
दूर व मुक्त
अध्ययन संस्था

INSTITUTE OF DISTANCE
AND OPEN LEARNING (IDOL)

क्र. दूवमुअसं/परीक्षा/४५२/२०२०,

**सुधारीत परिपत्रक :—**

मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेतर्फे प्रथम सत्र २०२० च्या परीक्षेस बसलेल्या प्रथम वर्ष वाणिज्य शाखेच्या अभ्यासक्रमातील सर्व विद्यार्थी आणि परीक्षा केंद्र असलेल्या महाविद्यालयातील प्राचार्य यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य शासनाने प्रदर्शित केलेल्या परिपत्रक क्र. संकिर्ण—२०२०/प्र.क्र. ६०/२०/तांशि—१ दि. १६ मार्च, २०२० नुसार करोना विषाणू (कोव्हीड—१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक खबरदारीसाठी दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत सर्व परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने परिपत्रक क्र. दूवमुअसं/परीक्षा/४५१/२०२० दि. २० मार्च, २०२० रोजी जाहीर करण्यात आले होते.

त्यानुसार प्रथम वर्ष वाणिज्य शाखेच्या दि. ३१ मार्च, २०२० रोजी Mathematical & Statistical Techniques ऐवजी **Foundation Course Paper - I** या विषयाच्या परीक्षेची सुधारीत दिनांक व वेळ लवकरच जाहीर करण्यात येईल तसेच दि. १ एप्रिल, २०२० रोजी शासनाच्या निर्देशानुसार व तत्कालीन परिस्थितीनुसार पुढील परीक्षा होतील, याची नोंद घेण्यात यावी.

दि. २० मार्च, २०२०.
मुंबई — ४०० ०९८.

20/03/2020
for संचालक

---

प्रति,

प्रथम वर्ष वाणिज्य शाखेचे सर्व विद्यार्थी, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे/संस्थाचे प्राचार्य/संचालक, सहायक कुलसचिव, रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र, मुंबई विद्यापीठ यांस माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्रमांक : संकिर्ण-२०२०/प्र.क्र. ६०/२०/तांशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दि. १६ मार्च, २०२०.

प्रति,

१. मा. कुलगुरु,
सर्व अकृषी /अभिमत/तंत्रशास्त्र/स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
२.संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य , पुणे.
३.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई .
४.संचालक,कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई .
५.संचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई

विषय : राज्यात करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत....

संदर्भ : १. सार्वजनिक आरोग्य विभाग,पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि.१४/०३/२०२०.
२. सार्वजनिक आरोग्य विभाग,पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि.१५/०३/२०२०.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची संदर्भाधिन पत्रे कृपया पहावित.

२. शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि.१३/०३/२०२० पासून लागू करुन खंड-२, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

३. करोना विषाणूचा होणारा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका,सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदींनुसार दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन क्र.१ येथील पत्राव्दारे सूचित करण्यात आले आहे.

४. तथापि या सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी , इयत्ता १२ वी तसेच विश्वविद्यालयांची प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे.तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना देखील संदर्भाधिन क्र.१ येथील पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

५. त्या अनुषंगाने तंत्र शिक्षण/कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी/अनुदानित/खाजगी शैक्षणिक संस्था/महाविद्यालये/ अकृषि विद्यापिठे दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत आपल्या स्तरावरुन

सर्व संस्थाप्रमुखांना तात्काळ सूचित करण्यात यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा असे या विभागाच्या दि.१४.०३.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

६. आता सार्वजनिक आरोग्य विभागाने संदर्भाधिन क्र.२ येथील पत्रान्वये दिलेल्या सुचनेस अनुसरून सर्व संबंधितांना खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या दि.१४/०३/२०२० व दि.१५/०३/२०२० च्या पत्रान्वये दिलेल्या सुचना लक्षात घेता,नागरी भागासोबतच राज्यातील ग्रामीण भागातील सर्व सरकारी /अनुदानित / खाजगी शैक्षणिक संस्था / महाविद्यालये / अकृषि विद्यापिठे /तंत्रशास्त्र विद्यापीठे/तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/वसतीगृहे दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद राहतील.

२) तंत्र शिक्षण/ उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे /तंत्रशास्त्र विद्यापीठे /सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे/सर्व अभिमत विद्यापीठे व त्यांच्याशी संबंधित सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित,विनाअनुदानित,कायम विनाअनुदानित /मॉडेल डिग्री महाविद्यालये/तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये /वसतीगृहे व परिसंस्था तसेच कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था/वसतीगृहे दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद राहतील.

३) राज्यातील सर्व सरकारी /अनुदानित / खाजगी शैक्षणिक संस्था / महाविद्यालये / अकृषि विद्यापिठे/तंत्रशास्त्र विद्यापीठे /तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/कला महाविद्यालये यांच्या दि.३१/०३/२०२० पर्यंत होणा-या सर्व परीक्षा व प्रात्यक्षिके पुढे ढकलण्यात येत आहेत. दि.०१/०४/२०२० पासूनची परीक्षा व प्रात्यक्षिके पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील.

४) सर्व सरकारी / अनुदानित / खाजगी शैक्षणिक संस्था / महाविद्यालये / अकृषि विद्यापिठे /तंत्रशास्त्र विद्यापीठे /तंत्रनिकेतने/ अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/कला महाविद्यालये या मधील सर्व अध्यापक हे दि.२५/०३/२०२० पर्यंत घरी राहून कामकाज (Work From Home) करु शकतील.

तथापि, आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास /प्रशासकीय कारणास्तव संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु/ उपकुलगुरु/ कुलसचिव/ उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे / तंत्रनिकेतनांचे प्राचार्य/संचालक/अधिष्ठाता यांनी निर्देश दिल्यास त्यानुसार अध्यापकांना संस्थेमध्ये तातडीने हजर राहणे बंधनकारक राहील.

५) विद्यापीठाचे कुलगुरु/उपकुलगुरु/कुलसचिव/उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे /तंत्रनिकेतनांचे प्राचार्य/ संचालक /अधिष्ठाता व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नियमितरित्या कार्यालयामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे.

६) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत दि.३१/०३/२०२० पर्यंत आयोजित केलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत.

७) उपरोक्त उपाययोजनांबाबत आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाहीच्या सुचना वेळोवेळी देण्यात येतील.

(सतीश ज. तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाही करिता,